राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत
समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२६
निवडणूक पूर्वतयारीबाबत...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्रमांक : रानिआ/जिपपस-२०२६/प्र.क्र.०६/का-०७,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ११/०१/२०२६.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

विषय:- **जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूक- २०२६ निवडणुकीची पूर्वतयारी...**

संदर्भ:- १) मा. सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपिल (सी) क्र.१९७५६/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.०६/०५/२०२५, दि.१६/०९/२०२५ व दि.२८/११/२०२५ रोजी दिलेले आदेश

२) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/जिपपंस-२०२५/ प्र.क्र.२०/का.७, दि.२३/०९/२०२५

३) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/जिपपंस-२०२५/ प्र.क्र.३०/का.७, दि.०१/१०/२०२५

महोदय/महोदया,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ ट व २४३ यक अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण यांची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अ.क्र.१ समोरील नमूद आदेशान्वये राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील मुदती संपलेल्या आणि ज्या ठिकाणी आरक्षण ५० टक्केपेक्षा कमी आहे अशा जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका विहित वेळेत घेण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना / आदेश दिलेले आहेत :-

(i) मतदार यादीच्या प्रभागनिहाय विभाजनाबाबत:- आयोगाचे संदर्भाधीन दि.२३/०९/२०२५ च्या आदेशान्वये देण्यात आलेला मतदार यादी विभाजनाचा कार्यक्रम.

(ii) आरक्षण निश्चिती/ सोडतीचा कार्यक्रम:- आयोगाचे संदर्भाधीन अ.क्र. ३ समोरील दि.०१/१०/२०२५ अन्वये देण्यात आलेला आरक्षण निश्चिती /सोडतीचा कार्यक्रम.

२. आता, ज्या ठिकाणी आरक्षण ५० टक्केपेक्षा कमी आहे अशा जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम आयोगाकडून स्वतंत्ररित्या जाहीर करण्यात येईल. मात्र सदर निवडणुकांच्या पूर्वतयारीबाबत पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

आदेश

३. उपरोक्त निवडणूका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची सर्व जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त यांची राहील. लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्यावेळी जी दक्षता व काळजी घेण्यात येते, ती सर्व दक्षता व काळजी या निवडणुकांमध्येदेखिल घेणे बंधनकारक आहे. तरी संबंधित जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांनी त्याप्रमाणे नियोजन करावे.

४. या निवडणुकांसाठी जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

**प्रत्यक्ष निवडणूक -**

४.१ **निवडणूक प्रक्रिया कर्तव्यदक्ष व नि:पक्ष अधिकारी यांच्याद्वारे हाताळणे-**

निवडणुकांचे कामकाज कर्तव्यदक्ष, निप:क्ष अधिकारी / कर्मचारी यांच्यामार्फत पार पाडणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक करण्याच्यादृष्टीने निवडणुकीशी संबंधित सर्व अधिकारी यांचा आढावा घेऊन आयोगाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाप्रमाणे योग्य अधिकाऱ्याची निवडणूकीसाठी नियुक्ती करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.६/का.५, दि.१६ जुलै, २०२५ अन्वये दिलेल्या आदेशांचे सर्व संबंधितांनी काटेकोरपणे पालन करावे.

४.२ **मतदान केंद्राबाबत**

(i) राज्य निवडणूक आयोगाच्या क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का.५,दिनांक २६/०६/२०२५ व २९/०८/२०२५ रोजीच्या आदेशातील सूचनांनुसार जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांची संख्या १००० ते ११००

मतदार प्रति मतदान केंद्र एवढी ठेवण्यात यावी. त्यामधील मार्गदर्शक तत्वानुसार मतदान केंद्राचे स्थान तसेच मतदान केंद्रनिहाय मतदारांची संख्या निश्चित करावीत.

(ii) संवेदनशील व अतिसंवेदनशील केंद्रांची यादी निश्चित करुन त्याबाबत योग्य ती उपाययोजना करावी.

(iii) मतदान केंद्राची प्रत्यक्ष पाहणी करुन सदर मतदान केंद्रावर आवश्यक त्या सोई-सुविधा उदा. सुव्यवस्थित खोल्या, शौचालय, पिण्याचे पाणी, वीज पुरवठा, रॅम्प, सुरक्षा भिंत इ. असल्याबाबत खात्री करावी.

(iv) आपल्या जिल्हयात आदर्श मतदान केंद्र तयार करताना पर्यावरण पूरक / पुनर्वापर योग्य (environment-friendly and reusable) व जीवाणुच्या सहाय्याने कुजविता येण्यासारख्या (bio-degradable) साहित्याचा वापर करुन मतदान केंद्र उभारावीत, शक्यतो ती प्लास्टीकमुक्त ठेवावीत. जास्तीत जास्त मतदान केंद्रे आदर्श मतदान केंद्रे ठेवण्याचा प्रयत्न करावा.

(v) निवडणुकीसाठी वापरण्यात येणारी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे तयार करावी व ती सुरक्षित ठेवण्यासाठी स्ट्रॉंग रुमची व्यवस्था करावी.

(vi) कोणत्याही कारणास्तव मतदानाच्या दिवशी व मतमोजणीच्या दिवशी संबंधित ठिकाणी वीज पुरवठा खंडीत होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**४.३ अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्तीबाबत**

(i) जिल्हयातील पंचायत समित्यांची संख्या लक्षात घेऊन प्रत्येक पंचायत समितीस एक याप्रमाणे उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्याची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तसेच तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्याची सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करावी. विभागीय आयुक्त यांनी आवश्यकतेप्रमाणे अधिकारी उपलब्ध करुन द्यावे. हे करीत असताना राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.२८/का.७, दि.१९/०९/२०२५ अन्वये दिलेल्या सूचना लक्षात घ्याव्यात. विभागीय आयुक्तांनी उपलब्ध करुन दिलेल्या अधिकाऱ्यांची निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती जिल्हाधिकारी करतील.

(ii) जिल्हयामधील पंचायत समितीनिहाय मतदान केंद्रांची संख्या लक्षात घेऊन जिल्हाधिकारी यांनी मतदान केंद्रांसाठी पुरेशा अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्त्या कराव्यात. यावेळी

किमान १० टक्के कर्मचारीवृंद अधिक्याने नेमण्यात येईल याची काळजी घ्यावी. तसेच राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्र.एसईसी-१०९५/३०६/डेस्क-३, दि.०२/०३/१९९५ व दि.१८ जुलै २०१८ रोजीच्या आदेशात नमूद केल्या प्रमाणे निवडणूक कामासाठी आवश्यक इतर कर्मचारीवृंद यांची सेवा अधिग्रहीत करावी. पोलिस यंत्रणेशी समन्वय साधून सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक पोलीस कर्मचारीवृंद नियुक्ती करण्याबाबत निदेशित करावे.

(iii) निवडणुकीच्या कालावधीत निवडणुकीशी संबंधित अधिकारी / कर्मचारी हे राज्य निवडणूक आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर राहतील. जर या अधिकारी / कर्मचाऱ्यांनी कामामध्ये निष्काळजीपणा अथवा कुचराई केली तर त्यांच्याविरुध्द निलंबनासह सर्व प्रकारची प्रशासकीय कारवाई (Disciplinary Action with Suspension) करण्याचे सर्व अधिकार राज्य निवडणूक आयोगास आहेत. तरी आयोगाच्यावतीने जिल्हाधिकारी यांनी आयोगाचे आदेश क्र.रानिआ२००६/प्र.क्र.१४/का.५,दि.०२/०८/२००६ लक्षात घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

४.४ **अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाबाबत :-**

जिल्हाधिकारी यांनी निवडणूक कामासाठी नियुक्त केलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांना आवश्यक त्या सर्व विषयांवर योग्य ते प्रशिक्षण दयावे. उदा. निवडणूक निर्णय अधिकारी तसेच सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांना त्यांच्या निवडणूक विषयक कामकाजाची ओळख व जबाबदारीची जाणीव करुन देण्याच्या उद्देशाने सर्व कायदेशीर तरतुदी तसेच आयोगाच्या आदेशांबाबतची माहिती द्यावी तसेच खालील नमूद विषयांबाबतचे विशेष प्रशिक्षण दयावे:-

(i) नामनिर्देशन पत्र स्वीकारणे, त्याची छाननी करणे, वैध उमेदवारांची यादी तयार करणे, उमेदवारी माघार घेणे, चिन्ह वाटप, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करणे, मतदान यंत्रे सुसज्ज करणे, इत्यादी.

(ii) आयोगास विविध टप्प्यांवर द्यावयाच्या अहवालाची पध्दती (संगणकीय प्रणाली, व्हॉटस् ॲप इ. चा वापर)

(iii) आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत राज्य निवडणूक आयोगाचे दि. ०४ नोव्हेंबर, २०२५ रोजीचे आदेश विचारात घेऊन कार्यवाही करणे.

(iv) आर्थिक बळाचा दुरुपयोग व मतदारांना देण्यात येणाऱ्या प्रलोभनांवर अंकुश ठेवण्यासाठी करावयाची उपाययोजना.

(v) पेड न्यूज, पेड सोशल कमेंट, सोशल मीडीया इत्यादीवर लक्ष ठेवण्यासाठी उपाययोजना

(vi) आयोगाने निश्चित केलेल्या पध्दतीनुसार अद्ययावत माहिती वेळेवर पाठविणे.

(vii) मतदान केंद्राध्यक्ष व इतर अधिकारी या सर्वांना मतदान यंत्र हाताळण्याबाबत प्रशिक्षण देणे.

(viii) कायदा व सुव्यवस्थेबाबत राज्य निवडणूक आयोगाचे दि.४ नोव्हेंबर, २०२५ रोजीचे आदेश विचारात घेऊन आवश्यक उपाययोजना करणे.

(ix) जाहिरात प्रमाणन, पेड न्यूज, समाजमाध्यमे, जनमत आणि मतदानोत्तर चाचणी, जाहिरात प्रसिध्दीचा कालावधी, प्रसार माध्यमांसाठी सुविधा इ. बाबींच्या अनुषंगाने क्र.रानिआ/मावज/२०२५/प्र.क्र.५/का-१०,दि.९ऑक्टोबर,२०२५ अन्वये निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५ प्रमाणे कार्यवाही करणे.

४.५ **प्रत्यक्ष निवडणूकीचा कार्यक्रम प्रसिध्द करणे -**

राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकास प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम शासन राजपत्रात तसेच स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक असते. तरी त्यानुसार निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यासंदर्भात योग्य ती उपाययोजना वेळीच करुन ठेवावी.

४.८ **मतदान साहित्य व निवडणुकीशी संबंधित इतर साहित्य -**

राज्य निवडणूक आयोगाने दि. २१ ऑगस्ट, २०२५ च्या परिपत्रकान्वये निवडणुकांरीता साहित्य उपलब्ध करुन घेणे, छपाई करुन घेणे तसेच अन्य मतदान साहित्य यांच्या खरेदी संदर्भात कोणती कार्यपध्दती अवलंबावी याबाबत सविस्तर निर्देश दिले आहेत. त्यानुसार आवश्यक साहित्य व छपाई वेळीच करुन ठेवावी.

५. **नामनिर्देशनपत्र, शपथपत्र, इतर कागद पत्रे सादर करण्याच्या प्रक्रियेबाबत.**

५.१ उमेदवारांना त्यांचे नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी खालील कागदपत्रे सादर करावी लागतात :-

(अ) नामनिर्देशनपत्र,

(ब) मत्ता व दायित्व तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबतचे शपथपत्र,

(क) शौचालय वापराबाबतचे प्रमाणपत्र अथवा स्वयंप्रमाणपत्र तसेच इतर आवश्यक प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती,

(ड) पक्षातर्फे निवडणूक लढवीत असल्याबाबत "नमुना-२अ" व "नमुना-२ब",

(इ) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र - (जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास जात पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा जात पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा व हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.)

(ई) मतदार अन्य प्रभागातील असल्यास मतदार यादीचा उतारा.

५.२ उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत सादर करावयाचे विहित शपथपत्र भरुन त्यावर स्वत:ची स्वाक्षरी करुन आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यासमोर दृढकथन करुन ते निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचे आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या क्र. रानिआ/मनपा-२०१४/का-०५, दि.८/१/२०१५ च्या आदेशानुसार अशी शपथपत्रे स्टॅम्प पेपरवर सादर करण्याची आवश्यकता नाही.

५.३ राखीव प्रभागातून सदस्य पदाची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि, जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्यांनी जात पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा जात पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा नामनिर्देशन पत्रासोबत सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवाराकडून नामनिर्देशनपत्रासोबत विहित केलेले याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे. (सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, दि. २६/१२/२०२५)

५.४ **पक्षाच्या उमेदवाराने द्यावयाचे जोडपत्र -**

महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५, दि.०५/०५/२०२५ रोजी प्रसिध्द केले आहेत. तसेच दि.०७/११/२०२५ च्या पत्रान्वये नामनिर्देशनपत्रासोबत नमुना २-अ स्वीकारण्याबाबत स्पष्टीकरण देण्यात आले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी. सदर आदेशानुसार राजकीय पक्षाने लेखी सूचना पत्रावर राजकीय पक्षाचे अध्यक्ष / सचिव किंवा अशी सूचना पाठविण्यास अधिकृत केलेल्या पक्षाच्या पदाधिकाऱ्याने काळ्या / निळ्या शाईने अथवा बॉल पेनने स्वाक्षरी करुन ते जिल्हाधिकारी यांना विहित मुदतीत देणे आवश्यक आहे. राजकीय पक्षांनी सदर नमुना २-अ लेखी सूचनापत्र सादर केल्याची पोहोच घेऊन त्याची छायांकित प्रत उमेदवारास द्यावी. उमेदवाराने त्याच्याशी संबंधित मूळ सहीचा नमुना २-ब व राजकीय पक्षाने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या नमुना २-अ ची छायांकित प्रत निवडणूक निर्णय अधिकारी यांना नामनिर्देशनपत्र सादर करण्याच्या अंतिम दिनांक व वेळेपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

५.५ **शौचालयाच्या वापराबाबतचे प्रमाणपत्र -**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांकरीता निवडणूक लढविणारा उमेदवार शौचालयाचा नियमित वापर करीत आहेत इ. बाबतचे संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्राधिकृत अधिकाऱ्याचे किंवा अशा व्यक्तीचे स्वयंप्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

५.६ **उमेदवारी मागे घेणे -**

उमेदवारास त्याची उमेदवारी मागे घ्यावयाची असल्यास त्याकरीता महाराष्ट्र जिल्हा परिषदा निवडणूक नियम १९६२ मधील नियम-२१ व महाराष्ट्र पंचायत समित्या निवडणूक नियम १९६२ मधील नियम-२० नुसार घ्यावयाचा अर्ज विहित पध्दतीने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचा आहे. उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज संगणकाद्वारे भरावयाचे नाहीत अथवा ई-मेलद्वारे देता येणार नाहीत.

६. **हेल्प डेस्क व प्रशिक्षण -**

सर्व उमेदवारांना नामनिर्देशनपत्र व शपथपत्र इ. भरण्यात अडचण येऊ नये म्हणून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी एक किंवा आवश्यकतेप्रमाणे त्यापेक्षा जास्त मदत कक्षांची (Help Desk) स्थापना करावी व हेल्प डेस्क सांभाळणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य ते प्रशिक्षण द्यावे. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाला पुरविण्यात आलेल्या पोलीस सुरक्षा व्यवस्थेमुळे इच्छूक उमेदवारांना मदत कक्षात जाण्यास अडचणी येणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.

७. **नामनिर्देशनपत्रासोबत जोडावयाच्या शपथपत्रातील कोणत्याही रकान्यात माहिती न भरल्यास :-**

आयोगाच्या क्र. रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.५/का.०६, दि.२७/०३/२०१५ च्या पत्रासोबतच्या भारत निवडणूक आयोगाच्या आदेश क्र. ५६७/३/२०१३-एसडीआर, दि.३०/०९/२०१३ मध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कार्यवाही करावी. याबाबत सर्व राजकीय पक्षांना माहिती देण्याकरीता आवश्यक त्या उपाययोजना संबंधित जिल्हाधिकारी यांनी कराव्यात.

८. **उमेदवारी मागे घेणे तसेच बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारास विजयी घोषित करण्याबाबत :-**

नामनिर्देशनपत्र भरण्याच्यावेळी अनेक उमेदवारांनी अर्ज भरुन देखिल एक उमेदवार वगळता अन्य सर्व उमेदवार ज्यावेळी अर्ज मागे घेतात, त्यावेळी सदर उमेदवाराने इतर उमेदवारांवर दबाव आणून उमेदवारी अर्ज मागे घेण्यास लावले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे असे प्रसंग घडल्यास आयोगास सविस्तर अहवाल तात्काळ पाठवावा व आयोगाने मान्यता दिल्यानंतरच त्या उमेदवाराला विजयी घोषित करावे. याबाबत आयोगाचे क्र.रानिआ/मनपा२००४/प्र.क्र.३७/का.५, दि.२३/१२/२००४ रोजीच्या आदेशाचे पालन करावे.

९. आचारसंहिता

९.१ आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी :-

सद्यस्थितीत निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर पोलीस, उत्पादन शुल्क व इतर संबंधित विभागांकडून प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जातात. परंतु प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी विशिष्ट कार्यपध्दतीचा अवलंब करणे आवश्यक असल्याने ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी काही कालावधी लागतो. त्यामुळे निवडणूक कार्यक्रम घोषित केल्यानंतर अशी कार्यवाही सुरु केल्यास निवडणुकीच्या मतदानाच्या दिनांकापर्यंत अशा सर्वच प्रकरणांना अंतिम स्वरुप दिले जाणे शक्य होत नाही. परिणामी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यामागील उद्देश सफल होत नाही. ही बाब विचारात घेता खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

(i) पोलीस विभाग, उत्पादन शुल्क विभाग व इतर संबंधित विभागाने सर्व प्रकारच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरु कराव्यात. उदा. :-

अ) ज्या लोकांमुळे (उदा.सराईत गुन्हेगार, फरार घोषित,परागंदा गुन्हेगार,संशयीत गुंड प्रवृत्तीचे लोक इ.) निर्भय, मुक्त व पारदर्शकरितीने निवडणुका घेण्यामध्ये अडथळा येऊ शकेल अशा संशयित लोकांची यादी तयार करुन चांगल्या वर्तणुकीसाठी बंधपत्र लिहून घेणे, तडीपारी करणे, इ.

ब) प्रलंबित वॉरंट / चलान बजावून पुढील कार्यवाही करणे.

क) मुंबई दारुबंदी अधिनियमान्वये प्राप्त झालेल्या अधिकारात धाडी घालणे, नवीन केसेस दाखल करणे व अशा प्रकरणात (जुनी व नवीन) निर्णय घेणे.

ड) पूर्वीच्या प्रलंबित निवडणूक गुन्ह्यांचा / दाव्यांचा पाठपुरावा करणे.

(ii) विमानतळ, रेल्वे, उत्पादन शुल्क, वन विभाग, नेव्ही, कोस्टगार्ड, इ. विभागांशी समन्वय साधून पैशाची व मद्याची अवैध मार्गाने होणारी वाहतूक व अन्य संशयास्पद हालचालीवर लक्ष ठेवणे.

(iii) निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शकरित्या पार पाडल्या जाव्यात यादृष्टीने वरील सर्व बाबींवर तार्किक (Logical) कार्यवाही प्रत्यक्ष निवडणुकीपूर्वी पूर्ण होईल याची दक्षता घेण्यात यावी .

९.२ राज्य निवडणूक आयोगाने दि. ०४ नोव्हेंबर, २०२५ च्या आदेशान्वये कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने आदेश निर्गमित केले आहेत. आचारसंहिता कालावधीमध्ये कायदा व सुव्यस्था राखण्यासाठी करावयाच्या आवश्यक उपाययोजना - उदा:-

(i) **व्हिडीओग्राफी सर्व्हेलियन्स पथक**- (Video Surveillance Team)

आचारसंहिता कालावधीमध्ये निवडणुकीच्या क्षेत्रामध्ये घडणाऱ्या महत्वाच्या घटना, मिरवणुका, प्रचार फेऱ्या, सभा अथवा आचारसंहितेच्यादृष्टीने महत्वाच्या घटनांचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात यावे.

अवाजवी खर्चाबाबत किंवा आचारसंहितेचा भंग होणाऱ्या घटनांबाबत या पथकाने निवडणूक निर्णय अधिकारी यांना त्वरित विनाविलंब माहिती उपलब्ध करुन द्यावी. एखादया प्रकरणी व्हिडिओग्राफी सर्व्हेलियन्स पथक - (Video Surveillance Team) उपलब्ध होवू न शकल्यास अधिकारी / कर्मचारी यांनी मोबाईलवर अशा प्रकरणांचे चित्रीकरण करुन निवडणूक निर्णय अधिकारी यांना संबंधित क्लीपसह अहवाल सादर करावा. या क्लीप तपासणीसाठी Video Viewing Team ठेवावी.

(ii) **भरारी पथक** (Flying Squad) :-

पैशाची व मद्याची अवैध मार्गाने वाहतूक, मतदारांना प्रलोभन ठरतील अशा व अन्य संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी भरारी पथक (Flying Squad) तैनात करण्यात यावे. या पथकाने योग्य ती तपासणी करुन आवश्यक त्या वस्तू जप्त कराव्यात व पुढील कायदेशीर कारवाई करावी.

(iii) **चेक पोस्टसाठी पथक** (Static Surveillance Team) :-

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील महत्वाचे नाके, इत्यादी जेथून मद्य / शस्त्रांची अवैध वाहतूक तसेच मतदारांना प्रलोभन ठरतील अशा वस्तूंची / पैशांची वाहतूक होऊ शकते, अशा ठिकाणी चेक पोस्ट तयार करुन वरील पथक नेमावे. या पथकाने योग्य ती तपासणी करुन बेकायदेशीर वस्तू जप्त करुन पुढील कायदेशीर कारवाई करावी. या सर्व गोष्टींचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात यावे.

(iv) **तक्रार निवारण कक्ष** :-

आचारसंहिता भंगाची तक्रार स्विकारण्यासाठी व त्यावर तातडीने कार्यवाही करण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे जिल्हास्तर किंवा स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय कंट्रोल रुम/ कॉल सेंटरची स्थापना करण्यात यावी. या कंट्रोल रुममध्ये उपलब्ध असलेले दूरध्वनी / मोबाईल क्रमांक यांना योग्य ती प्रसिध्दी द्यावी.

वरील तिन्ही पथके व तक्रार निवारण कक्षासाठी जिल्हाधिकारी यांनी पोलिस अधिक्षक यांच्याशी सल्लामसलत करुन योग्य अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती करावी. उदा. नायब तहसिलदार, पोलिस उप निरीक्षक, व्हिडिओग्राफर व शस्त्रधारी पोलिस, इत्यादी तसेच त्यांना त्यांचे काम व्यवस्थित रितीने करता यावे यासाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था (वाहनासह) उपलब्ध करुन द्यावी.

**९.३ आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व खर्चावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे व मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तूंच्या वाटपावर अंकुश ठेवण्यासाठी उपाययोजना :-**

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक निवडणूक संनियंत्रण समिती स्थापन करण्यात यावी. यामध्ये खालीलप्रमाणे सदस्य असतील :-

| | अनिवार्य सदस्य | आवश्यकतेप्रमाणे सदस्य |
|---|---|---|
| १ | जिल्हा पोलिस अधिक्षक | महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | महाराष्ट्र राज्य प्रादेशिक परिवहन कार्यालय |
| ३ | आयकर विभागाचे अधिकारी | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| ४ | विक्रीकर विभागाचे अधिकारी | विद्यापिठे |
| ५ | अबकारी विभाग | जिल्हा माहिती अधिकारी (DIO), इत्यादी |
| ६ | बँकेचे वरिष्ठ अधिकारी | |

या समितीवर आवश्यकतेप्रमाणे इतर अधिकारी घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

(i) जिल्हाधिकारी यांनी योग्य त्या अधिकाऱ्याची **समिती सचिव** म्हणून नियुक्ती करावी.

(ii) संनियंत्रण समितीने आवश्यक त्या सर्व विषयावर शास्त्रोक्त आराखडा तयार करुन योग्य ती कार्यवाही करावी उदा.:-

a. कायदा व सुव्यवस्था राखणे - प्रतिबंधात्मक उपाययोजनांसह (संवेदनशील, नक्षलग्रस्त, इत्यादी भागांसाठी विशेष व्यवस्था)

b. आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे

c. मतदारांवर प्रभाव टाकण्याकरिता देण्यात येणाऱ्या वस्तूंच्या जसे- मद्य (Liquor), पैसा इत्यादीच्या वाटपावर अंकुश ठेवणे.

d. प्रत्येक उमेदवार व राजकीय पक्ष यांनी खर्चाबाबतची व्यवस्थित माहिती वेळेवर सादर करणे.

e. रोख रकमांच्या ने-आण संदर्भात लक्ष ठेवणे. त्यासाठी सर्व महत्वाच्या ठिकाणी उदा. विमानतळ, रेल्वे स्थानक, हॉटेल्स, फार्म हाऊस यांच्यावर नजर ठेवणे.

f. अशा सर्व व्यवहार व हालचालीवर जसे - तारण, वित्तीय हवाला दलाल (Pawn Brokers, Financial Brokers, Hawala Agents) लक्ष ठेवणे.

g. बँकांमार्फत होणाऱ्या मोठया व संशयास्पद आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवणे.

h. आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मावज/२०२५/प्र.क्र.०५/का.१०, दि.०९/१०/२०२५ प्रमाणे पेड न्यूज, सोशल कमेंट, सोशल मीडिया व इंटरनेट इत्यादींवर लक्ष ठेवणे.

**९.४ जाहिरात प्रमाणन समिती गठित करणे-**

जाहिरात प्रमाणन, पेड न्यूज, समाजमाध्यमे, जनमत आणि मतदानोत्तर चाचणी, जाहिरात प्रसिध्दीचा कालावधी, प्रसार माध्यमांसाठी सुविधा इ. बाबींच्या अनुषंगाने क्र.रानिआ / मावज / २०२५ / प्र.क्र.५ / का-१०, दि.९ ऑक्टोबर, २०२५ अन्वये निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५ निर्गमित करण्यात आले आहेत, त्या अन्वये समितीचे गठन तात्काळ करावे.

**९.५ आचारसंहिता क्षेत्र-**

जिल्हा परिषदा / पंचायत समितींच्या सार्वत्रिक निवडणुका असल्याने संपूर्ण जिल्ह्यामध्ये आचारसंहिता लागू राहील. मात्र याबाबत स्पष्ट करण्यात येते की, जिल्हा परिषद क्षेत्राबाहेरील म्हणजेच त्या जिल्हयातील नगर पंचायत/ नगर परिषद वा महानगरपालिका क्षेत्रात नेहमीप्रमाणे सर्व कामे व अनुषंगिक बाबी करण्यावर कोणतेही निर्बंध असणार नाहीत. परंतु संबंधित जिल्हा परिषदेतील मतदारांवर प्रभाव टाकणारी कोणतीही कृती/घोषणा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था वा मंत्री, खासदार, आमदार वा कोणत्याही पदाधिकाऱ्यांना करता येणार नाही.

**९.६ आचारसंहितेचा कालावधी -**

राज्य निवडणूक आयोग ज्यावेळी निवडणुकीचा कार्यक्रम घोषित करेल त्या दिनांक व वेळेपासून आचारसंहिता लागू होईल व ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील.

९.७ आचारसंहितेचे आदेश -

आयोगाचे क्र. रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४२/का.७, दिनांक ०४/११/२०२५ मधील तरतुदींचे सर्वतोपरी पालन होईल याची संबंधितांनी दक्षता घ्यावी. आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत या आदेशात नमूद नसलेली काही अपवादात्मक परिस्थिती उद्भवल्यास जिल्हाधिकारी यांनी आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव मार्गदर्शनाकरिता राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवावा. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आयोगाच्या कार्यालयाकडे आचारसंहितेप्रकरणी परस्पर संदर्भ करु नये. मंत्रालयीन विभागांनी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीमार्फतच आचारसंहितेसंदर्भातील प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगास पाठवावेत.

९.७ **खर्चावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे व मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी वस्तुंच्या वाटपावर अंकुश ठेवणे :-** निवडणुकीसाठी आचारसंहिता कालावधीत मतदारांना प्रभावित करण्याकरिता तसेच प्रलोभन देण्यासाठी उमेदवारांकडून तसेच राजकीय पक्षांकडून नवनवीन उपाययोजना करण्यात येतात. याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय, तसेच मा. उच्च न्यायालयाच्या विविध निकालांमध्ये चिंता व्यक्त करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने भारत निवडणूक आयोगाकडून आचारसंहितेबाबत काही उपाययोजना करण्यात येतात. त्याचधर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही दक्षता घेण्यात यावी.

१०. निवडणूक खर्च -

१०.१ **निवडणूक खर्च सादर न केल्यास अनर्ह ठरविणे** - सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६, दि.१० मे, २०१० अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी विहित रितीने खर्चाचे हिशोब सादर न करणाऱ्या उमेदवारांना अनर्ह घोषित करण्याची तरतूद करण्यात आली असून या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक-रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष (ब), दि. १५ फेब्रुवारी, २०२४ अन्वये कार्यवाही करावी.

१०.२ **निवडणूक खर्च मर्यादा** - उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक-रानिआ/मनपा/२०२५/प्र.क्र.४५/का-५, दिनांक २९ ऑक्टोबर, २०२५ मध्ये नमूद केल्यानुसार राहील. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाच्या अद्ययावत आदेशानुसार याबाबत कार्यवाही करावी.

१०.३ **निवडणूक खर्च सादर करण्याचा कालावधी -**

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक-रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/ संगणकीकरण कक्ष(ब), दिनांक १५ फेब्रुवारी, २०२४ नुसार सविस्तर कार्यवाही निश्चित करून दिली आहे. त्यानुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने दैनंदिन खर्चाचा हिशोब निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून विहीत मुदतीच्या आत एकत्रित खर्चाचा तपशील संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे सादर करावयाचा आहे.

११. **मतदान यंत्राच्या सर्व बॅलेट युनिट वरील END बटण पांढऱ्या रंगाच्या मास्किंग टॅबने बंद ठेवण्याबाबत -**

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ-२०२५/प्र.क्र.११/का-१४, दि.२७ नोव्हेंबर, २०२५ अन्वये बॅलेट युनिटवरील END बटण पांढऱ्या मास्किंग टॅबने बंद ठेवण्याबाबत आदेश काढले आहेत. त्यामुळे END बटणाचा वापर या निवडणुकीत होणार नाही. यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी सदर आदेश सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्यावेत. मतदान यंत्र तयार करताना (Commissioning of EVM) कॅन्डीडेट सेटींग झाल्यानंतर बॅलेट युनिट सील करण्यापूर्वी, बॅलेट युनिटवरील END बटण पांढऱ्या मास्किंग टॅबने बंद करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

१२. **स्ट्रॉंगरुम -**

मतदानानंतर मतदान यंत्रे कोणत्या ठिकाणी सुरक्षित ठेवण्यात येतील. याबाबत वेळीच उपाययोजना करुन ठेवावी व त्याठिकाणी आवश्यक स्ट्रॉंगरुम तसेच स्ट्रॉंगरुमच्या ठिकाणी आवश्यक असलेली सुरक्षाव्यवस्था व खबरदारीच्या उपाययोजना करुन ठेवाव्यात.

१३. **मतमोजणी :-**

मतमोजणीकरिता राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ/ मनपा-२००९/प्र.क्र.१६/का.५, दि. २१ डिसेंबर, २००९ व दि. २९ मार्च, २०१० तसेच आयोगाचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.२५/का.५, दि.१८ फेब्रुवारी, २०१७ नुसार कार्यवाही करण्यात यावी. मतमोजणीच्यावेळी अनावश्यक गर्दी / गोंधळ होणार नाही यासाठी योग्य ती उपाययोजना करावी.

**प्रमाणपत्रे** - निवडून आलेल्या उमेदवारांना देण्याकरीता विहित नमुन्यातील प्रमाणपत्रे तयार ठेवावीत.

**मेमरी चिप्स** - निवडणुकीसाठी वापरण्यात आलेल्या काढता येणाऱ्या मेमरी चीप्स मतमोजणीनंतर आयोगाच्या निर्देशानुसार सुरक्षित, सीलबंद स्वरुपात ठेवण्यात याव्यात.

१४. **मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी उपाययोजना :-**

(i) जिल्हा परिषदा / पंचायत समितींच्या निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी ही ७५ ते ८० टक्के असली तरी मतदानाची टक्केवारी वाढविण्याबरोबरच Ethical Voting म्हणजेच निवडणुकीमधील नैतिकता वाढविण्याच्याद्दष्टीने राज्य निवडणुक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार सर्व संबंधितांची मदत घेऊन (उदा. विद्यापीठे, महाविद्यालये, उद्योग समूह, अशासकीय संस्था, बँका, हॉटेल, रेस्टॉरन्ट, इ.) मोठया प्रमाणावर जनजागृती मोहीम राबविण्यात यावी.

(ii) जनजागृतीसाठी सर्व प्रकारची उपाययोजना व माध्यमांचा वापर करण्यात यावा. उदा. पारंपारिक व कल्पक योजना, नवीन तंत्रज्ञान, सोशल मीडिया, इत्यादी

१५. **मतदार जनजागृती आणि शिक्षण** (Voters awareness & Education)

१५.१ मा.सर्वोच्च न्यायालयातील सिव्हील अपील क्र.७१७८/२००१ दि.०२ मे, २००२ च्या आदेशानुसार उमेदवारांची माहिती मतदारांना असणे हा मतदारांचा हक्क असल्याबाबत निर्वाळा दिलेला आहे. त्याअनुषंगाने उमेदवाराकडून त्याच्या शैक्षणिक अर्हता, मत्ता व दायित्व तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबत शपथपत्र घेण्यात येते याबाबतचे आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस/ २०१५/प्र.क्र.५१/का.७, दि.१३/०८/२०१८ अन्वये विहित केलेल्या नमुन्यात प्राप्त होणारे शपथपत्रास खालीलप्रमाणे प्रसिध्दी देण्यात यावी तसेच शपथपत्रातील माहितीच्या (निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय मतपत्रिकेवरील अनुक्रमांकानुसार) गोषवाऱ्यास पुढीलप्रमाणे प्रसिध्दी द्यावी:-

(i) निवडणूक निर्णय अधिकारी यांचे सूचना फलक

(ii) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था व जिल्हाधिकारी यांच्या संकेतस्थळावर

(iii) स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरातीद्वारे (शक्यतो)

१६. निवडणूक निरीक्षक :-

संबंधित विभागीय आयुक्त यांनी निवडणूक प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी निवडणूक निरीक्षक नेमण्याबाबतची कार्यवाही करावी. निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणूकांसाठी आवश्यक त्या सर्व व्यवस्थेबरोबरच, आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी, खर्चावर नियंत्रण, आर्थिक बळाचा दुरुपयोग व मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तूंच्या वाटपावर अंकुश, इत्यादी कामांवर त्यांनी लक्ष ठेवावयाचे आहे.

१७. **इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व मार्कर पेन यांच्या वापराबाबत तसेच पितळी सील पुरवठयाबाबत:-**

(i) जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणूका इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर घेण्यात येतील. याबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या मतदान यंत्राद्वारे निवडणूका घेण्यासंदर्भात यथास्थिती कार्यवाही करावी. मतदान केंद्राच्या संख्येच्या आढावा वेळीच घेण्यात यावा. उपलब्ध असलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या माहितीसह निवडणूकीसाठी आवश्यक मतदान यंत्रांची संख्या व त्यासाठी लागणारे साहित्य (पेपरसील, पट्टीसील, स्पेशल टॅग, मार्कर पेन) इ. बाबतची माहिती आयोगास ई- मेलद्वारे पाठविण्यात यावी, जेणेकरून मतदान यंत्र व इतर साहित्याची व्यवस्था वेळेत करण्यात येईल. तसेच इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या सुरक्षिततेसाठी सुस्थितीत असलेल्या स्ट्रॉग रूमची व्यवस्था करावी.

(ii) मार्कर पेनने मतदाराच्या बोटाला निशाणी करण्याबाबत आयोगाच्या क्र. रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.१०/का.०५, दि.१९/११/२०११ च्या पत्रातील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच हे मार्कर पेन वापरण्या योग्य आहे किंवा कसे याची आपल्या स्तरावर खातरजमा करण्यात यावी.

(iii) संबंधित जिल्हाधिकारी यांनी राज्य निवडणूक आयोगाकडून पुरविण्यात आलेले पितळी सील संबंधित तहसीलदार यांना आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन द्यावेत.

१८. **मतदारांना व्होटर स्लीपचे वाटप करण्याबाबत :-**

लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदारांना फोटो असलेल्या व्होटर स्लीपचे वाटप करण्यात यावे. यासाठी संगणकीकृत मतदार यादी करताना व्होटर स्लीप तयार करावी.

१९. निवडणूक विषयक अहवाल आयोगास सादर करण्याबाबत :-

(i) राज्य निवडणूक आयोगाकडून स्वतंत्ररित्या निवडणूक कार्यक्रम देण्यात येईल. त्यानंतर आयोगाने विहित केलेल्या वेळापत्रकानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांनी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करावा.

(ii) निवडणुकीतील टप्पे राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या तारखेस पार पाडावेत. तसेच प्रत्येक टप्पा पार पाडल्यानंतर त्याबाबतची माहिती-

(अ) जिल्हा परिषद व पंचायत समिती वेबसाईवर प्रसिध्द करावी. तसेच

(आ) राज्य निवडणूक आयोगास ई-मेलद्वारे माहिती तात्काळ पाठवावी.

(iii) राज्य निवडणूक आयोगाच्या दि.०१/१२/२००४ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार खोटे मतदान करणे, जबरदस्तीने मतदान केंद्राचा ताबा घेणे, मतदान यंत्रावर जबरदस्तीने मते नोंदविणे, वगळलेल्या मतदारांच्या यादीतील लोकांना मतदान करु देणे यासारख्या सर्व महत्वाच्या घटना अथवा गैरप्रकार राज्य निवडणूक आयोगाला ताबडतोब कळविण्याची दक्षता घ्यावी.

(iv) आयोगाने निश्चित केलेल्या पध्दतीनुसार अद्ययावत माहिती वेळेवर पाठवावी. यासंदर्भातील आयोगाचे दि.२४/१०/२०१६ व दि.०९/११/२०१६ चे आदेश पहावेत.

(v) **निवडून आलेल्या सदस्यांची नावे प्रसिध्द करण्याबाबत :-**

उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यात आल्यावर संबंधित निवडणूक नियमातील तरतुदीनूसार सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिध्द करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी विहित कालावधीत पूर्ण करावी व त्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा.

२०. इतर

(i) निवडणूक खर्चावर आळा बसविणे आवश्यक असल्याने मा. सर्वोच्च न्यायालयाने सन १९७५ मध्ये खालीलप्रमाणे प्रतिपादित केले आहे.

"…..The object of the provision limiting the expenditure is twofold. In the first place, it should be open to any individual or any political party, howsoever small, to be able to contest an election on a footing of equality with any other individual or political party,

howsoever rich and well financed it may be, and no individual or political party should be able to secure and advantage over others by virtue of its superior financial strength…..

The other objective of limiting the expenditure is to eliminate, as far as possible, the influence of big money in the electoral process. If there was no limit on expenditure, political parties would go all out for collecting contributions….. The pernicious influence of big money would then play a decision role in controlling the democratic process in the country"…..

(ii) हे सर्व लक्षात घेता निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात होतील याकरिता निवडणुकांशी निगडित सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी कोणत्याही पक्ष व उमेदवार यांची बाजू न घेता (प्रामुख्याने सत्तेमध्ये असलेल्या पक्षाबाबत) निष्पक्षपणे व नियमाप्रमाणे कामे करावीत. तसेच मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणाऱ्या किंवा प्रलोभन देणाऱ्या सर्व योजना किंवा कृत्यांवर लक्ष ठेवून अंकुश ठेवावेत.

(iii) याकरिता राज्य निवडणूक आयोगाने बहुतांशी सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेले आहेत.

**२१. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या खालील निर्णयांकडे जिल्हाधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांचे लक्ष वेधण्यात येत आहे :-**

(अ) श्री. एल.आर.शिवराम गौडा व इतर वि.टी.एम.चंद्रशेखर सिव्हिल याचिका क्र.४२७२/१९९१ "निवडणूक आयोगास उमेदवाराने सादर केलेल्या खर्चाचा तपशील योग्य आहे किंवा कसे हे तपासण्याचे अधिकार आहेत"…..

(ब) श्री. एम.एस गिल रिट याचिका क्र. १२९७/१९७७ उद्भवलेली अनपेक्षित परिस्थिती हाताळण्यासाठी "कायदा / आदेश" मध्ये तरतूद नसेल तर परिस्थितीनुरुप सुबुध्दीने निर्णय घेण्याचे अधिकार ) आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ-२०१६/अहाका/ प्र.क्र.१०/ सं.क., दि. ०४/१०/२०१६)

(क) मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.६०६/१९९३ भारत सरकार विरुध्द एम.एस.गिल याप्रकरणी दिनांक २१/०९/२००० रोजी दिलेल्या निर्णयानुसार, निवडणुकीच्या कामामध्ये निष्काळजीपणा अथवा कुचराई करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द निलंबनासह प्रशासकीय कारवाई करण्याचे अधिकार (राज्य निवडणुक आयोगाचे आदेश क्र.रानिआ-

२००६/प्र.क्र.१४/का.५, दि.०२/०८/२००६ व भारत निवडणूक आयोगाचे आदेश क्र.४/२००१/जेएस-२, दि.०७/०२/२००१)

२२. **राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक :-**

राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील संकेतस्थळ ई-मेल पुढीलप्रमाणे आहेत :-

संकेतस्थळ:- https://mahasec.maharashtra.gov.in

ई-मेल :- sec.zpps@mah.gov.in

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

१४.०१.२०२६

( सुरेश काकाणी )

सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२

२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

त्यांना कळविण्यात येते की, जिल्हा पोलीस अधिक्षकांना आवश्यकतेनुसार पोलीस दल, जिल्हाधिकाऱ्यांना उपलब्ध करुन देण्याच्या सूचना द्याव्यात.

३) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.

४) प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम इमारत, मर्झबान पथ, मुंबई-१

त्यांना कळविण्यात येते की, ग्रामीण निवडणुकीसाठी आवश्यक अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मागणीचा विचार करुन त्यांना तात्काळ मंजूर करावे.

६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

७) सर्व विभागीय आयुक्त

८) सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक

९) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई-४

त्यांना कळविण्यात येते की, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक साधनसामग्री विनाविलंब पुरविण्यात यावी.

१०) उप आयुक्त, (कार्या-१४ मतदान साहित्य वाटप),

त्यांना कळविण्यात येते की, संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून ई.व्ही.एम., पेपर सील, पट्टी सील, स्पेशल टॅग, पितळी सील व मार्कर पेनची मागणी प्राप्त करुन घ्यावी व आवश्यकतेनुसार त्यांना साहित्य वाटप करण्यासंदर्भातील कार्यवाही करण्यात यावी.

११) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई

१२) राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व कार्यासने

१३) निवड नस्ती (कार्यासन-७), राज्य निवडणूक आयोग